tarun bharat 24 may 2026:Copy of Layout 1 23-May-26 7:32 PM Page 1



# छ.संभाजीनगर-जालना विधानपरिषदेसाठी भाजपात इच्छुकांची फौज!

## कैलास गोरंट्याल, राहुल लोणीकर, भास्कर दानवे, सतीश घाटगे मैदानात; उमेदवारीसाठी राजकीय हालचालींना वेग

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राज्यात आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकांची राजकीय रणधुमाळी आतापासूनच सुरू झाली असून छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघात भारतीय जनता पक्षामध्ये उमेदवारीसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. या मतदारसंघातून भाजपाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी चार दिग्गज नेत्यांनी जोरदार फिल्डिंग लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे भाजपामध्ये इच्छुकांची मोठी स्पर्धा निर्माण झाली असून आगामी काळात पक्षश्रेष्ठी कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ घालणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या निवडणुकीसाठी जालना जिल्ह्यातून भाजपाचे माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर, भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे तसेच समृद्धी शुगरचे चेअरमन सतीश घाटगे यांनी जोरदार तयारी सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. चारही नेत्यांनी आपापल्या स्तरावर कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक स्वराज संस्थांमधील सदस्यांशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केली असून राजकीय समीकरणांना वेग आला आहे. माजी आमदार कैलास गोरंट्याल हे जालना जिल्ह्यातील अनुभवी आणि आक्रमक नेतृत्व म्हणून ओळखले जातात. विधानसभा पातळीवरील त्यांचा अनुभव आणि जिल्ह्यातील राजकीय संपर्क लक्षात घेता त्यांचे नाव सध्या जोरात चर्चेत आहे. दुसरीकडे भाजप-ाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी युवकांमध्ये मोठे संघटन उभे केले असून राज्यभरातील पक्ष संघटनेत त्यांनी सक्रिय भूमिका निभावली आहे. युवा चेहरा आणि संघटनात्मक ताकद यामुळे त्यांची दावेदारी अधिक मजबूत






मानली जात आहे. महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी शहरातील भाजप संघटना मजबूत करण्यात मोठी भूमिका बजावली असून स्थानिक स्वराज संस्थांमधील त्यांचे नेटवर्कही भक्कम असल्याचे बोलले जात आहे. तर समृद्धी शुगरचे चेअरमन सतीश घाटगे यांनी ग्रामीण भागात मोठा जनसंपर्क निर्माण केला असून सहकार क्षेत्रातील प्रभावामुळे त्यांचेही नाव चर्चेत आले आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर-जालना हा मतदारसंघ राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. भाजपासाठी हा मतदारसंघ प्रतिष्ठेचा बनला असून उमेदवारीसाठी इच्छुकांनी दिल्ली-मुंबईपर्यंत लॉबिंग सुरू केल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. पक्षश्रेष्ठींसमोर निष्ठा, संघटन क्षमता, आर्थिक ताकद, स्थानिक स्वराज संस्थांमधील संपर्क आणि जिंकण्याची क्षमता हे निकष महत्त्वाचे ठरणार असल्याचे राजकीय जाणकार सांगत आहेत. विशेष म्हणजे, भाजपामध्ये अनेक इच्छुक सक्रिय झाल्यामुळे अंतर्गत गटबाजी पुन्हा एकदा उफाळून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रत्येक इच्छुक आपल्या समर्थकांच्या माध्यमातून ताकद दाखवण्याचा प्रयत्न करत असून बैठका, संपर्क दौरे आणि रणनीती आखण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत या मतदारसंघातील राजकीय वाता-वरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

आता भाजपाचे केंद्रीय आणि प्रदेश नेतृत्व कोणावर विश्वास दाखवते, कोणाला उमेदवारीची संधी मिळते आणि कोणाचा राजकीय गेम मजबूत ठरतो याकडे जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. विधानपरिषद निवडणुकीपूर्वीच भाजपामध्ये सुरू झालेली ही राजकीय चुरस पुढील काळात आणखी रंगतदार होणार यात शंका नाही.

## संक्षिप्त

### अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि.२७ मे २०२६ रोजी बकरी ईद (चंद्र दिवस पुढे किंवा माग्र), दि.२८ मे २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती दि. ३१ मे २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती, सण उत्सव साजरे होणार आहेत. तसेच दि. ३१ मे २०२६ रोजी एम.पी.एस.सी. ची परीक्षा होणार आहे. सदर सण, उत्सव जयंतीच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात व शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात.

तसेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण बचाव व धनगर समाज एस. टी. प्रवर्गात समाविष्ठ करावे या अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध प्रकारचे आंदोलन कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा सुव्यवस्-थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

तसेच महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द गटबाजी व आरोप प्रत्यारोप विविध कारणांवरुन सुरु आहेत. तसेच शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी विविध संघटनाकडून आत्मदहन,उपोषण, धरणे मोर्चे, निर्दशने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारतायेत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप, विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.

तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि.२३ मे २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ५ जुन २०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### अपंग प्रशिक्षण केंद्रात ३० जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलूर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग (अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद) मुला- मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्रिर क डोमेस्टिक ऍप्लायंसेस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फिटर, एलिमेंट ऑफ कॅम्प्यु टिर इंजीनिअरिंग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस, डेस्कटॉप पब्लिशिंग डीटीपी, कॉम्प्युटर अकाँटिंग व ऑफिस ऑटोमेशन व अरबत्ती, खडू, धुप बनवणे इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे. तरी इच्छुक दिव्यांग (अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद) मुला- मुलींनी किंवा पालकांनी दि ३० जुन २०२६ पर्यंत तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र,भायेगाव रोड, देगलूर ता. देगलुर जि. नांदेड मो. नं. ९९६०९००३६९,९४०३२०७१००,७३७८६४११३६ येथे पत्रव्यवहार करावे किंवा समक्ष भेटण्याचे आवाहन प्राचार्यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## जाफराबाद दुय्यम निबंधक कार्यालयातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करा

### २५ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील कथित गैरव्यवहार, बेकायदेशीर जमीन खरेदी-विक्री व्यवहार तसेच मुद्रांक विक्रीतील अनियमिततेबाबत नागरिकांनी थेट राज्य शासनाकडे तक्रार दाखल केली असून संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक, महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. तक्रारीत दुय्यम निबंधक कार्यालयातील काही अधिकाऱ्यांवर संगनमताने बोगस एन.ए. दाखले तयार करून जमीन खरेदी-विक्री व्यवहार वैध ठरवल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच महसूल विभागाची दिशाभूल करून शासनाची फसवणूक झाल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तक्रारदारांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील काही ठिकाणी शेतजमिनींचे तुकडे करून विनापरवाना विक्री करण्यात आली. यामध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे व्यवहार करून सामान्य नागरिकांची दिशाभूल करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. काही प्रकरणांमध्ये एसडीएम कार्यालयाच्या आदेशांकडे दुर्लक्ष करून व्यवहार झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. याशिवाय मुद्रांक विक्रीतही मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही मुद्रांक विक्रेते शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने मुद्रांक विक्री करत असल्याचा आरोप असून, व्यवहारांची नोंद व्यवस्थित ठेवली जात नसल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी, दलाल व मुद्रांक विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, दोषींवर गुन्हे दाखल करून त्यांचे परवाने रद्द करावेत, अशी मागणी तक्रारदार मिलिंद दिलीप गायकवाड व विकास भगवान गायकवाड यांनी केली आहे. दरम्यान, यापूर्वी ६ एप्रिल रोजीही याबाबत तक्रार देण्यात आली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने २५ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आमरण उपोषणाला बसण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## डिझेल पेट्रोलचे भाव ऑटोक्यात ठेवण्यात मोदी सरकारला यश -आ.लोणीकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**



माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी जागतिक बाजारपेठेत इंधन दरांमध्ये सातत्याने होत असलेल्या चढ-उताराच्या पार्श्वभूमीवर केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने भारतातील डिझेल व पेट्रोलचे दर नियंत्रणात ठेवण्यात यश मिळवले असल्याचे सांगितले. ते तहसील कार्यालय परतूर येथे आयोजित करण्यात आलेल्या परतूर विधानसभा मतदारसंघातील पेट्रोल पंप चालक-मालकांच्या बैठकीत बोलत होते.

यावेळी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, अनेक देशांमध्ये इंधन दरांमध्ये मोठी वाढ होत असताना भारतात सामान्य नागरिक, शेतकरी आणि वाहतूक क्षेत्रावर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये यासाठी केंद्र सरकारने वेळोवेळी योग्य नियोजन केले आहे. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असून ग्रामीण भागात शेतीच्या कामांना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर व इतर शेतीसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी डिझेलचा अखंड आणि सुरळीत पुरवठा होणे अत्यंत आवश्यक असल्याचे आमदार लोणीकर यांनी नमूद केले. मतदारसंघातील सर्व पेट्रोल पंप चालकांनी शेतकऱ्यांना प्राधान्य देत त्यांना वेळेत डिझेल उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. काही ठिकाणी अवैध वापरासाठी मोठ्या प्रमाणावर डिझेलची वाहतूक होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे येत असल्याचेही त्यांनी सांगितले. पेट्रोल पंप चालकांना स्थानिक प्रशासनाने प्रत्यक्ष वाहनांमध्येच डिझेल-पेट्रोल भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र शेतकऱ्यांचा ऐन मशागतीचा हंगाम असल्यामुळे केवळ २० लिटर डिझेलसाठी ट्रॅक्टर पंपावर आणणे आणि परत नेणे यातच मोठ्या प्रमाणावर वेळ व इंधन खर्च होत होते. या पार्श्वभूमीवर आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देण्यात आल्या व कॅनमध्ये डिझेल देण्याचा निर्णय घेण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

कृषी सेवा केंद्र चालकांनाही त्यांनी कठोर इशारा दिला. शेतकऱ्यांना खत विक्री करताना कुठल्याही प्रकारची लिंकिंग करू नये तसेच खतांची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये. शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या अथवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांविरोधात प्रशासनामार्फत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आमदार लोणीकर यांनी दिला. यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे, तहसीलदार दामोदर जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, गटविकास अधिकारी तांगडे, परतूरचे पीआय भागवत, मंठा पीआय देशमुख, एपीआय अतुल पाटील, एपीआय सुरवशे, पुरवठा अधिकारी जाधव, भाजपा तालुका अध्यक्ष विक्रम उफाड, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, अजय अवचार, गजानन उफाड यांच्यासह मतदारसंघातील पेट्रोल पंप चालक व कृषी सेवा केंद्र संचालक उपस्थित होते.

## एकीकडे डिझेल टंचाई तर दुसरीकडे मजुर मिळेना; वाढत्या दरामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मागील दहा-बारा वर्षापासून शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती तसेच शेतकऱ्याकडे शेतीमाल असताना शेतीमालास योग्य बाजार भाव नसल्याने शेती व्यवसायात दरवर्षी तोटा सहन करावा लागत आहे. तरी देखील दरवर्षी शेतकरी पावसाळ्याच्या पूर्वीच नव्या जोमाने खरीपाच्या तयारीला लागतो. यावर्षी शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्री केल्यानंतर कापूस व सोयाबीनचे भाव वाढले आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसला तर आता खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतकऱ्यांसमोर वाढत्या मशागतीच्या खर्चाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. नामांकित कंपनीचे बियाणे व रासायनिक खतांच्या दरात वाढ झाली असल्याने शेतकरी आधीच अडचणीत आला असताना आता शेतीमध्ये मशागतीसाठी ट्रॅक्टरसह विविध यंत्र भाड्याने देण्याचे दरही वाढले आहेत. शेती कामाकरिता मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना यंत्रांची मदत घ्यावी लागत आहे. मात्र, वाढत्या दरामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत येत आहेत.

ट्रॅक्टर भाडे, इंधन दरवाढ, मशागतीचा खर्च, वाढलेली मजुरी तसेच बियाणे आणि खतांच्या वाढलेल्या किमतीमुळे शेतीमाल उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली आहे. त्यामुळे हंगाम सुरु होण्यापूर्वीच अनेक शेतकरी आर्थिक तणावाखाली आले आहेत. पेट्रोल पंपावर डिझेल



मिळेना तसेच डिझेल पेट्रोलचे भाव वाढल्याने ट्रॅक्टर मालकांनी भाडे दर वाढवल्याने शेतजमीन तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना पूर्वीपेक्षा आता जास्त पैसे मोजावे लागत आहेत. विशेषतः लहान आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी हा वाढता खर्च मोठी डोकेदुखी ठरत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा ट्रॅक्टर मशागतीच्या दरात २० टक्क्यांनी वाढ झाल्याचे चित्र आहे. डिझेल दरवाढ, यंत्रसामग्रीच्या देखभालीचा खर्च आणि मजुरी वाढल्याने ट्रॅक्टर भाडे वाढवावे लागल्याचे ट्रॅक्टर मालकांचे म्हणणे आहे. डिझेलच्या दरात वाढ झाल्याने ट्रॅक्टरद्वारे होणाऱ्या नांगरणी, वखरणी व इतर मशागतीच्या खर्चात वाढ झाली आहे. डिझेल दर वाढ होण्यापूर्वी ट्रॅक्टरचालक प्रतिएकर १८०० रुपये घेत होते आता त्यांनी दरवाढ केली आहे. आधीच बियाणे, खते व मजुरीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. दरवर्षी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर नामांकित कंपनीचे दर्जेदार बी-बियाणे व रासायनिक खते निविष्ठा खरेदीसाठी शेतकऱ्यांची घाई सुरु होते आहे. यंदाचा पावसाळा सुरू होण्यास अवघ्या काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीसाठी आवश्यक असलेले बियाणे, खते आदी निविष्ठांची खरेदी सुरू केली आहे. परंतु सर्व दरवाढीमुळे शेतकऱ्यांचे यावर्षीचे आर्थिक नियोजन सुरुवातीपासूनच कोलमडले आहे. शेतीकामांमध्ये यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असला तरी अनेक कामे करण्याकरिता शेतमजुराची गरज पडतेच. तालुक्यातील अनेक छोटे शेतकरी व शेतमजूर रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतरित झाले आहेत. परिणामी गावांमध्ये शेतीकामांसाठी सहजरीत्या मजूर उपलब्ध होत नाही आणि उपलब्ध मजुरांकडून वाढीव मजुरीची मागणी केली जात आहे. जास्त मजुरी देऊनही अपेक्षित वेळेत काम पूर्ण होत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पूर्वी मजूर दिवसाला सात ते आठ तास राबत होते, मात्र आता केवळ चार-पाच तासच काम केले जात असून मजुरीच्या दरातही वाढ झाली आहे.

### सध्या शेतीच्या मशागतीसाठी प्रति एकर लागणारे दर

नांगरणी दोन हजार रुपये, रोट्यावेटर १००० ते १२०० रुपये, पाळी ९०० ते १००० रुपये, कोळपणी ७०० ते ८०० रुपये, ट्रॅक्टरने शेतीची सपाटीकरण प्रति तास ८०० ते हजार रुपये, जेसीबीच्या साह्याने नालासरळीकरण, बांध टाकणे व इतर कामाकरिता प्रति तास हजार रुपये.



## अंबडमध्ये अवैध डिझेल साठ्यावर प्रशासनाचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

दि २३ मे अंबड तालुक्यामध्ये अवैध रित्या पेट्रोल आणि डिझेलची साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर प्रशासनाने आज, दिनांक २३ मे २०२६ रोजी धडक कारवाई केली आहे. अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण आणि तालुका पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून एकूण १०० लिटर अवैध डिझेल जप्त केले आहे.


तालुक्यात काही ठिकाणी विनापरवाना व अवैध पद्धतीने इंधनाचा साठा करून त्याची चढ्या दराने विक्री होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे महसूल व पुरवठा विभागाने तातडीने पथके तयार करून आज विविध ठिकाणी अचानक तपासणी मोहीम राबवली. स्वामी समर्थ किराणा दुकान (कानडगाव, ता. अंबड): येथे तपासणी दरम्यान १० लिटर अवैध डिझेल मिळून आले. अर्जुन झेरॉक्स अँड मल्टि सर्विसेस (चिंचखेड, ता. अंबड): या ठिकाणी छापा टाकून ४० लिटर डिझेल जप्त करण्यात आले. स्वामी समर्थ नाश्ता सेंटर (शहापूर, ता. अंबड): या हॉटेलवर केलेल्या कारवाईत सर्वाधिक ५० लिटर अवैध डिझेल साठा हस्तगत करण्यात आला. महत्त्वाची नोंद: आजच्या या संपूर्ण कारवाईमध्ये एकूण १०० लिटर अवैध डिझेल जप्त करण्यात आले असून, संबंधितांवर नियमानुसार पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अशा प्रकारे विनापरवाना आणि असुरक्षित रित्या पेट्रोल-डिझेलसारख्या ज्वलनशील पदार्थांचा साठा करणे हा गंभीर गुन्हा असून, यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अंबड तालुक्यात अवैध रित्या इंधन साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. आज झालेली कारवाई ही केवळ सुरुवात असून, तालुक्यात ही धडक मोहीम आणि कारवाई यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहणार अ सल्याचे अंबडचे तहसिलदार विजय चव्हाण, पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांना शेत कामासाठी पेट्रोल,डिझेल मिळत नसल्याने भोकरदन तहसीलमध्ये फवारणी पंप वाजवून आंदोलन

### शेतकरी नारायण लोखंडे, विकास जाधव यांनी प्रशासनाचे वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

मिरची उत्पादक शेतकऱ्यांना औषध फवारणी करण्यासाठी पेट्रोल,डिझेल मिळत नसल्याने संतप्त शेतकरी पुत्रांनी भोकरदन तहसील कार्यालयाच्या बाहेर फवारणी पंप वाजवून प्रशासनाच्या आडमुठी धोरणाचा निषेध नोंदविला. शेतकऱ्यांना पेट्रोल,डिझेल मिळायला पाहिजे या घोषणांनी परिसर दनानला.यावेळी नायब तहसीलदार बालाजी पुप्पलवाड व नायब तहसीलदार सदानंद नाईक यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, जालना



जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलची मोठी टंचाई निर्माण झाली आहे.पेट्रोल पंपावर रांगा लागल्या असून शेकडो वाहने उभी आहेत.अश्यातच शेतकऱ्यांची पावसाळयापूर्वीची मशागतीची कामे यामुळं रखडली आहेत.नागरणी करण्यासाठी डिझेल मिळत नसल्याने ट्रक्टर उभे असून कामे रखडली आहे.पावसाळा येत्या पंधरा दिवसात सुरु होणार आहे.तसेंच भोकरदन तालुक्यात मोठ्या प्रमाणात मिरची लागवड देखील करण्यात आली आहे.मात्र पेट्रोल व डिझेल मिळत नसल्याने मिरची पिकावर औषध फवारणी करण्यासाठी पेट्रोल मिळत नसल्याने मिरची खराब होत आहे तसेच पाणी देण्यासाठी इंजिन देखील डिझेल अभावी बंद आहे.यामुळं मिरची उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहे.पेट्रोल पंप चालक शेतकऱ्यांना कॅन मध्ये पेट्रोल डिझेल देत नसल्याने इंजिन व फवारणी पंप घेऊन जाने शक्य नाही,त्यामुळ शेतकऱ्यांना कुठल्याच प्रकारे अडविण्यात येऊ नये ही विनंती.खत देखील मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावे.अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलने छेडण्यात येतील असा ईशारा निवेदनात दिला आहे.

» शेतकऱ्यांना कॅन मध्ये अथवा बाटली मध्ये पेट्रोल व डिझेल देण्यात येऊ नये अन्यथा दंडात्मक कारवाईचा आदेश २० मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी काढला आहे.यामुळं शेतकऱ्यांचे कामे रखडली आहे.जर शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल मिळणार नसेल तर पिरची पिकाला औषध फवारणी व पाणी देण्यासाठीचे मशीन पंपावर घेउंन जायचे का असा प्रश्न समोर आहे.जसा ५ टक्के इंधन पुरवठा शासकीय वाहनांसाठी राखीव आहे तसा ४० टक्के पुरवठा शेतकऱ्यांसाठी राखीव करण्यात यावा. अन्यथा जिल्हाभर आंदोलनाचा भडका उठायला वेळ लागणार नाही. **-नारायण लोखंडे, शेतकरी पुत्र**

» शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात डिझेल,पेट्रोल इंधन पुरवठा करण्यात यावा. पावसाळा तोंडावर आलेला असतांना सर्व मशागतीची कामे रखडली आहे.त्यामुळ तात्काळ शेतकऱ्यांना नागरणी व इतर औषध फवारणी साठी पेट्रोल,डिझेल उपलब्ध करून देण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार आहोत. **-विकास जाधव, सामाजिक कार्यकर्ता**